## चारोळ्या – भाग २७

त्या क्षणाला त्यांचं मोल
कळत नाही आपल्याला
कळलं तरी आपलं मन
वळत नाही त्या दिशेला.

हा नवा, तो नवा
इथे सारेच नवखे
जिथे, तिथे, खोटा दिखावा,
अन्, माणुसकीला पारखे.

स्वप्नं किती
विचित्र असतात
पाहणाऱ्याला ती
रात्रभर जागवतात.

काही स्वप्नं रंगतात
काही स्वप्नं भंगतात
मग, आठवणींच्या रूपात
ती आपल्याला छळतात.




– पद्माकर चित्रे
(‘मी न माझा’ या चारोळीसंग्रहातून)